18 09 1989 - Maharashtra Times, Mumbai edition

टाटा थिएटरमध्ये रंगलेली बैठकीची लावणी

लावणीचेही विविध प्रकार आहेत. छावणीत रंगणारी लावणी वेगळी, फडात रंगणारी लावणी वेगळी, तर बैठकीची लावणी अगदीच वेगळी असते. आजच्यासारखा घाईगर्दीचा जमाना जेव्हा नव्हता, त्या जमान्यात एखाद्या गजगामिनीप्रमाणे संथ गतीने वावरणाऱ्या बैठकीच्या लावणीची बैठक रात्रीपासून पहाटेपर्यंत कशी रंगत असे त्याचा एक उत्कृष्ट नमुना एन. सी. पी. ए.ने गेल्या मंगळवारी संध्याकाळी नरिमन पॉइंटवरील टाटा थिएटरमध्ये सादर केला.

निरूपकांची कामगिरी

श्री. पु. ल. देशपांडे आणि डॉ. अशोक रानडे यांचे उत्कृष्ट निरूपण ही या कार्यक्रमाची मोठीच जमेची बाजू होती. बैठकीच्या शेकडो लावण्या उपलब्ध असताना त्यातून नेमक्याच पंधराएक लावण्यांची निवड करणे, श्री. शरद जांभेकर, श्री. नारायण बोडस, सौ. उत्तरा केळकर, सौ. श्रुती काटकर, सौ. मेधा गोगटे, कु. फैयाझ या गायक-गायिकांपैकी प्रत्येकाच्या गळ्यातील नैसर्गिक गुणावगुण हेरून त्यानुसार लावण्यांची योजना करणे, या सर्व कलाकारांकडून या लावण्या उत्तम बसवून घेणे आणि ओघवत्या निरूपणात त्या गुंफून एका बाजूने गाणाबजावण्याची रंगत राखणे, तर दुसऱ्या बाजूने या रंगाचा जराही भंग न होता लावणी बाजाचे सौन्दर्य रसिकांसमोर उलगडणे ही कामगिरी खरोखरी अवघड. ही अवघड कामगिरीही मैफलीत सोपी भासली त्याचे फार मोठे श्रेय दोन्ही निरूपकांना द्यावे लागेल. पु. ल. म्हणाले त्याप्रमाणे जुनी सृष्टी शब्दांच्या, सुरांच्या साह्याने उभी करण्याचा हा एक प्रयोग होता, तर रानडे म्हणाले त्याप्रमाणे लोकसंगीतात समाविष्ट केलेले गानप्रकार दुर्लक्ष करण्यासाठी नसतात याची जाणीव करून देण्यासाठी हा एक प्रयोग होता. दोन्ही दृष्टीनी हा प्रयोग चांगलाच सफल झाला.

गणरायाला आवाहन

महाराष्ट्रातील अग्रगण्य ढोलकीवादक श्री. पांडुरंगराव घोटकर यांच्या सुरेख ढोलकीवादनाने आरंभीच लावणीच्या मैफलीचे मस्त वातावरण तयार केले. लावणीच्या आसपास हिंडणाऱ्या गणाला खरे तर बैठकीच्या लावणीत प्रवेश नसतो, पण 'या नाचत रंगणी गणोबा हो तुम्ही गौरीचे आरती' हा पट्ठे बापूरावांचा प्रसिद्ध गण श्री. शरद जांभेकरांनी मस्त ऐकविला. मैफल निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी ढोलकीने आणि गणाने गणरायाला केलेल्या या आवाहनापासूनच मैफल रंगू लागली. या गणापाठोपाठ 'शुभ मंगल चरणी गण नाचला' हा पट्ठे बापूरावांचाच आणखी एक लोकप्रिय गण जांभेकरांनी ऐकविला.

लावणीचे विविध रंग

यानंतर बैठकीच्या लावणीतही किती विविध रंग असू शकतात त्याचे मनोहर दर्शन या मैफलीने रसिकांना घडविले. या प्रत्येक रंगाचे वैशिष्ट्य काय, तो लावणीत नेमका कसा पाहावा यादृष्टीने दोन्ही निरूपक मैफलीला उत्तम दिशा देत राहिले. त्यामुळे रसिकांना या प्रत्येक रंगाचा नेमका आस्वाद घेता आला. रागातालाच्या समावेशाने सिद्ध झालेली होनाजीची लावणी, उडत्या चालीची लावणी, गाता गाता, गाण्याच्या

श्रीकृष्ण दळवी

ओघाओघात विलंबित लयीतून मध्य लयीत, मध्य लयीतून द्रुत लयीत सहज प्रवेश करणारी, पण या सतत चालणाऱ्या यतिबदलामुळे गायिकेची आणि साथीदार वादकाची दोघांचीही कसोटी पाहणारी लावणी, मराठी ठुमरी म्हणून अवतरलेली लावणी, चार ठिकाणी चाल बदलणारी चौकाची लावणी, नृत्यानुकूल लावणी, अदाकारीची लावणी अशा लावणीच्या विविध प्रकारांचे एक अप्रतिम प्रात्यक्षिकच या मैफलीने दिले. पांडुरंगराव घोटकरांची संबळ त्यांच्या मुलाची कृष्णा घोटकरची ढोलकी यांची जुगलबंदी रंग मारून गेली.

काही विचार

या सर्व लावण्या रंगत असताना निरूपणातून काही मोलाचे विचार सहज व्यक्त होऊन गेले. भास्करबुवा बखल्यांसारखे जुन्या जमान्यातील मोठमोठे ख्यालगायकही लावणी गाण्यात कमीपणा मानीत नसत हे सांगताना पु. ल.नी भास्करबुवांच्या लावणीगायनाचा एक किस्साच ऐकविला. गाण्यात जातिभेद नसतो. फक्त ख्याल ख्यालाच्या कायद्याने गावा, लावणी लावणीच्या कायद्याने गावी इतकेच हा विचार या किश्श्यातून व्यक्त झाला. अदाकारी म्हणजे अदब राखून केलेले सूचन ही अदाकारीची सुरेख व्याख्या रानड्यांनी केली. समाजातील संगीत बदलले की समाजच बदलत चालला असे समजावे. उदाहारणार्थ, आजकाल डिस्कोच्या तालावर येणारे गणपती. हा विचार खरोखरी विचार करायला लावणाराच म्हणावा लागेल. तराण्यातील बोलांना शब्दकोशातील अर्थ नसेल, पण शब्दाच्याही पलीकडे जाणारा आशय असतो हाही एक मोलाचा सांगीतिक विचार. लावणीतील एरवी खडे वाटणारे बोलही सुंद्राबाईंनी किंवा बालगंधर्वांनी गायिले की खडीसाखर बनत हे पु. लं.नी केलेले रसग्रहण म्हणजे मार्मिकता.

सर्वच कलाकारांची चोख कामगिरी

प्रत्येकानेच आपल्या वाटणीचे काम मन लावून चोख बजाविले की एकूण कार्यच कसे उठावदारपणे उभे राहते त्याचे ही मैफल म्हणजे उत्कृष्ट उदाहरण. सर्वच गायक-गायिकांनी आपल्या वाट्याला आलेले गण म्हणा, लावण्या म्हणा अशा ठसक्यात ऐकविल्या की मैफल सतत रंगतच राहिली.

साथसंगत

लावणीत सारंगीची सुरेल साथ कसा रंग भरते याचा उत्तम नमुना सारंगीवादक श्री. अनंत कुंटे यांनी केला. त्यांची साथ सर्वांची दाद घेऊन गेली. ढोलकीचा उल्लेख वर केलाच आहे, पण श्री. शेखर खांबेटे यांची तबलासाथही तशीच उल्लेखनीय होती. खास लावणीचे असे उत्तम ठेके त्यांनी धरले होते. श्री. चंद्रचूड वासुदेव आणि श्री. वगळ या दोघांची हार्मोनियमसाथही उत्कृष्ट होती.

श्री. रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे कोणत्याही कार्यक्रमात रंग हा सर्वांत महत्त्वाचा. या मैफलीत तर गायक-गायिका, साथीदार, निरूपक सर्वांनीच रंग भरला.

मा. श्री. अशोक दा. रानडे

आजच्या कार्यक्रमासाठी
आमच्या हार्दिक शुभेच्छा व सहकार्य

- रुपाली वाईन शॉप
- सरोज वाईन शॉप
- राम रमेश ट्रेडर्स
- राधिका वाईन शॉप
- विशाल एजन्सीज
- श्री वाईन मार्ट
- देवगिरी इंजिनिअरींग एम्.आय.डी.सी.
- मे. पालेकर बेकरी
- मे. व्ही. एन्. चिपळूणकर जर्देवाले
- मे. भुर्के ॲन्ड सन्स
- मे. हिन्द एजन्सीज

मुद्रण :- प्रिन्ट ॐ ऑफसेट सातारा फोन ३११८

सातारा/रुपाली

लोकरंगमंच

आयोजित

स्वरानंद सातारा



बैठकीची लावणी

राष्ट्रीय संगीत नाटय केंद्र (एन.सी.पी.ए.) मुंबई.

- वेळः शनिवार दि. २३ मार्च १९९१ रोजी रात्रौ ९.३० वा.
- स्थळः शाहू कलामंदिर, सातारा.

बैठकीची लावणी

लावणीचे अनेक प्रकार आहेत.
त्यातला अधिक संयमी प्रकार म्हणजे
बैठकीची लावणी.

मधुर गायन, माफक अभिनय, रुचणारा शब्द शिणगार ही बैठकीच्या लावणीची प्रमुख लक्षणे. होनाजी बाळाने सुरुवात करून दिलेल्या बैठकीच्या लावणीच्या प्रवाहात नवे झरे आणून सोडले ते १८५० नंतरच्या अनेक अनामिक कलावंतानी. यात लावण्या रचणारेही आले तसेच त्यांना चाली लावणारेही. ही लावणी उघड उघडपणे ठुमरी बाजाची, पण या तिच्या अंगाकडे दुर्लक्ष झाले, आणि बैठकीची लावणी रंगवणारे गवई दिसेनासे झाले.

पुन्हा तो काळ यायला हवा. शास्त्रोक्त
गाणारांनी मराठी रचना गायला हव्यात.
शब्दाचे रंग, रुप, गंध आणि नाद
यांची मजा घेत घेत !
यासाठी बैठकीच्या लावणीसारखे दुसरे
काय मिळणार ?

राष्ट्रीय संगीत नाट्य कला केंद्र
(एन्. सी. पी. ए.) मुंबई.

सादर करीत आहे 'बैठकीची लावणी'

बैठकीची लावणी -

संकल्पन, संगीत मार्गदर्शन, निरूपण :
डॉ. अशोक दा. रानडे

कलाकार -

कु. फैय्याज,
सौ. श्रुती सडोलीकर-काटकर
सौ. किर्ती शिलेदार
सौ. रंजना जोगळेकर
सौ. मेधा गोगटे
श्री. नारायण बोडस,
श्री. शरद जांभेकर

वादक :

श्री. पांडुरंग घोटकर,
श्री. अनंत कुंटे
श्री. चंद्रचूड वासुदेव
श्री. प्रकाश वगळ,
श्री. शेखर खांबेटे

लोकरंगमंच सातारा — **सहयोग** — **स्वरानंद** सातारा

- रांग नंबर १ व २ देणगीदारांसाठी राखीव
- कार्यक्रमाला येताना ही निमंत्रणपत्रिका सोबत आणावी.

शृंगाररसप्रधान लावणीचं सौम्य अन अधिक मार्दवपूर्ण रूप म्हणजे बैठकीची लावणी.एन.सी.पी.ए. या संस्थेनं तयार केलेला हा कार्यक्रम गायन समाज देवल क्लबच्यावतीनं १६ फेब्रुवारीला आणि देवगाणी हा कार्यक्रम १७ फेब्रुवारीला कोल्हापुरात सादर होत आहे. त्यानिमित्त 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमाची संकल्पना, पूर्वतयारी याविषयी डॉ. अशोक रानडे यांचा लेख...

काळ्या कातळाच्या कुशीत एखादं शुभ्र फूल उमलून यावं तसं लोकसंगीत मराठी मातीत रुजलेलं. राकट मराठी मातीतील सारी कोवळीक उमलून आली ती लोक-संगीताच्या रूपानं. त्यातही डफावर कडकडलेली थाप उसळत्या मराठी रक्ताला आवाहन करत गेलीच. पण अस्थैर्याच्या उंबरठ्यावर मर्दुमकीचे पोवाडे गात उभ्या असलेल्या मराठी जनमानसाला क्षणभराचा खरा विसावा देऊ केला तो तलम, रेशमी पोताच्या लावणीनं !

सोनसळी जरतारी लुगडं, दंडात रुतलेली मोरपंखी चोळी, कानातील लक्षवेधी बुगडी, नजरेतील सूचकता अशा मनोहारी रूपात नाकातील नथीचा आदब राखत लावणी घुंगरांच्या तालावर मराठी हृदय जिंकत गेली. ही शृंगाररसप्रधान लावणी पेशवाईच्या अस्ताच्या सुमाराला काहीशी सौम्य बनत गेली. तिचं हे सौम्य अन अधिक मार्दवपूर्ण रूप म्हणजे बैठकीची लावणी.

तमाशाच्या फडातून पांढरपेशांच्या दिवाणखान्यात, बैठकीपर्यंत प्रवास केलेली ही 'बैठकीची लावणी' आज अस्तंगत होण्याच्या मार्गावर दिसते. एके काळी अत्यंत समृद्ध रूपात अस्तित्वात असलेल्या या संगीत प्रकारची ओळख रसिकांना व्हावी या हेतूने एन.सी.पी.ए.नं 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमाची निर्मिती केली.

''उत्तर हिंदुस्थानी संगीतातील शब्दाला महत्त्व देणारे प्रकार म्हणजे भक्तिसंगीत, गझल आणि ठुमरी. या प्रत्येक प्रकाराला मिळालेला मराठी 'जबाब' म्हणजे अनुक्रमे वारकरी संगीत, भावगीतं आणि बैठकीची लावणी.' या तिन्हीपैकी वारकरी संगीत अन् भावगीतांचं स्थान अद्याप अबाधित आहे. काळाच्या ओघात मागे पडली ती बैठकीची लावणी !

खरं तर तिन्हीतील फक्त बैठकीची लावणी समाजमनातून अगदी कळत-नकळत पुसली गेली. याचं नेमकं सबळ कारण आढळत नाही. तरीही गाणाऱ्याच्या आणि ऐकणाऱ्याच्या चुकीमुळे तिची सोनसळी काया झाकोळत गेली, असं वाटतं. १९२० च्या सुमाराला या रूप संपन्न लावणीला उतरती कळा लागली. या कालखंडात ऐकणाऱ्यांची अभिरूची बदलत गेली अन् त्याकडे गाणाऱ्यांनी दुर्लक्ष केलं. लावणीसारखे खेळ करणारे वर्ग सामाजिकदृष्ट्या मागासलेले होते, पण समाजाचा दृष्टिकोन १९२० नंतर बदलला. तो अधिक पांढरपेशा बनला. त्यामुळे या लावणीकडे दुर्लक्ष होत गेलं.''

''दरम्यान, नाट्यसंगीतानं पुष्कळसा रसिकवर्ग आपल्याकडे ओढून नेला. त्यानंतरच्या काळात सिनेमा-रेडिओ आणि अलीकडे दूरदर्शन यांनी आपला प्रभाव गाजवायला सुरवात केली. या माध्यमांकडे संगीत- अधिक परिणामकारकरित्या रसिकांपर्यंत पोहोचण्याची ताकद असल्यामुळे ती बलवान ठरली. अस्तित्व टिकविण्यासाठीच्या लढाईत मुळात काहीशी दुबळी झालेली बैठकीची लावणी टिकाव धरू शकली नाही.

''बैठकीच्या लावणीला लाभलेल्या 'आश्रयदात्या'चा विचार केला, तर ती 'राजाश्रया' ऐवजी रसिकांच्याच आश्रयानं पोसत गेली.''नवशिक्षित मध्यम वर्ग हाच तिचा खरा आश्रयदाता ठरला. डॉक्टर, न्यायाधीश आदींच्या दिवाणखान्यात समारंभप्रसंगी बैठकीची लावणी

मराठी ठुमरी

बैठकीची लावणी

गायली जात असे आणि तीही प्रामुख्यानं पुण्या-मुंबईत !''

फडाची लावणी मुळात नृत्यप्रधान आहे. त्या लावणीत गाण्याला महत्त्व कमी असतं. इतकंच नव्हे तर गाण्याला मर्यादाही पडतात. परंतु बैठकीची लावणी शब्दाला प्राधान्य देते आणि अभिनय शब्दाच्या अंगानं येतो. फडाच्या लावणीत 'कथा' असते. बैठकीची लावणी, कथा साकारत नाही, तर तिच्या संहितेचा, भावेनचा विस्तार ती गीताच्या माध्यमातून करते आणि म्हणून ती उत्तर हिंदुस्थानी संगीतातील 'ठुमरी'शी साधर्म्य साधून जाते.

हिंदुस्थानी संगीतचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर सांगीतिक कल्पनांचं स्वरूप समजून घ्यायला हवं. बैठकीची लावणी ही त्यापैकीच एक मधुर कल्पना आहे. महाराष्ट्राच्या सांगीतिक इतिहासाची पानं कशी लिहिली, हे या कल्पनेच्या माध्यमातूनच समजून घेता येते..

...असाच प्रयत्न करताना एक प्रयोग म्हणून 'बैठकीची लावणी'चा दृक्-श्राव्य कार्यक्रम आकाराला आला. त्यावेळी या प्रकाराच पुनरुज्जीवन करायचं असा हेतू नव्हता. तर 'गेली पंधरा-वीस वर्षे यमुनाबाई वाईकर, सत्यभामाबाई पंढरपूरकर, पारूबाई बकुळाबाई इस्लामपूरकर यांसारख्या कलावंतांना ऐकत आलो होतो. त्याविषयी निर्माण झालेल्या आकर्षणाला अभ्यासाचं परिमाण दिलं. या संगीत प्रकाराविषयीचं वाङ्मय आणि बैठकीच्या प्रवर्तक सुंदराबाई यांच्यासारख्या ध्वनिमुद्रिका यांच्या माध्यमातून बैठकीच्या लावणीची बैठक आकाराला येत चालली.

पूर्वी या लावणीला नृत्याचं कोंदण होतं. आता ती पुन्हा प्रचारात आणायची तर समर्थ गायकांच्या गळ्यातूनच यायला हवी, याची खूणगाठ बांधली., तत्कालीन भाषेच्या पोताचा नेमका स्पर्श उमजून घेण्याची क्षमता असलेले, चांगल्या आवाजाबरोबर चांगले उच्चार असलेले आणि पूर्णपणे नवा प्रकार शिकण्याची ओढ मनात असलेले गायक आवश्यक होते. या लावणीचं ठुमरीशी असलेलं सारखेपण लक्षात घेऊन हिंदुस्थानी संगीताचे संस्कार असणारे कलाकाराच तिला न्याय देऊ शकतील, असं वाटतं.

ही पूर्वतयारी झाल्यानंतर जुन्या बैठकीच्या लावणीला अभ्यास आणि कल्पकतेची सांगड घालून डॉ. रानडे यांनी एक नवा प्रवाह त्यात अलगद मिसळला. विसाव्या शतकाच्या सुरवातीनंतर वाढ खुंटलेली ही लावणी जर शब्द, लालित्य यांच्या अंगानं उत्तरोत्तर समृद्ध होत गेली असती, तर आज नेमक्या कोणत्या रूपात अस्तित्वात असती, याचा मागोवा त्यांनी घेतला आणि काही नव्या रचनाही त्यात गुंफल्या.

या रंगतदार कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगवान हालचालीपेक्षा सूक्ष्म अभिनयाला आपलासा मानणारी, उत्तानपणापेक्षा संयमित शृंगाराला झुकतं माप देणारी सूचकतेचा साज ल्यालेली काहीशी नागरी नखऱ्याचीही लावणी समाजाच्या सांस्कृतिक अभिरूचीच्या आवर्तनात आपलं स्थान मिळण्याच्या प्रतीक्षेत आहे !



बैठकीची घरंदाज लावणी

९ एप्रिलला एनसीपीएच्या रंगमंचावर बऱ्याच वर्षांनी डॉ. अशोक रानडे यांनी बसविलेल्या 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमाचं सादरीकरण होणार आहे. महाराष्ट्र टाइम्स माध्यम प्रायोजक असलेल्या या कार्यक्रमाची ही झलक.

» मुकुंद कुळे
mukund.kule@timesgroup.com

महाराष्ट्राची लोककला असलेल्या लावणीला गेली काही वर्षं ऊर्जितावस्था देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून लावणी आता नाट्यगृहांमध्ये थिरकू लागली आहे. मात्र आज प्रामुख्याने रसिकांसमोर सादर होणारी लावणी ही खडी म्हणजे नाचून सादर होणारी लावणी आहे. पण लावणीचा घरंदाजपणा निरखायचा नि अनुभवायचा असेल, तर त्यासाठी बैठकीच्या लावणीचाच आस्वाद घ्यायला पाहिजे. बैठकीची लावणी सादर करणाऱ्या कलावतींचा त्या लावण्यांवरचा अभिनय इतका कसदार आणि घरंदाज असतो, की आशय अश्लील असला, तरी रसिकांचं लक्ष आशयापेक्षा त्याच्या अभिव्यक्तीकडे अधिक जातं. त्यामुळेच रसिकांकडून दाद मिळते ती, आशयानुसार सादर होणाऱ्या भावोत्कट अदेला.

महाराष्ट्रात लावणीला उर्जितावस्था आली ती, दुसऱ्या बाजीरावाच्या अमलात! त्याने शाहिरांना दिलेल्या आश्रयातच बैठकीच्या लावणीचाही इतिहास दडलेला आहे. दुसरा बाजीराव विषयासक्त होता, पण कलासक्तही होता. शाहीर मंडळी नेहमीच्याच वळणाच्या लावण्यांची रचना सादर करत असताना, त्याने होनाजी बाळाला उत्तरेत सादर होणाऱ्या ठुमरी, कजरी, चैती या उपशास्त्रीय गानप्रकारांच्या धर्तीवर लावणीचं लेखन आणि गायन करायला सांगितलं आणि होनाजी बाळाने ती करामत करून दाखवली. नंतर त्याचं अनुकरण करत पेशव्यांच्या दरबारातील अनेक शाहिरांनी रागदारी लावण्या रचल्या आणि गायल्याही.

या शाहिरांकडूनच या लावण्यांचा प्रसार पुण्यातील तत्कालीन बावनखणीत झाला. बावनखणीतल्या कलावंतिणींनी लावण्यांची ही रागदारी गायनकला केवळ आत्मसातच केली नाही, तर आपल्या अभिनयाने ती अधिक खुलवली. बावनखणी ऐन बहरात असताना त्यावेळी बैठकीच्या लावण्या गाणाऱ्या महिलाकलावंतांकडे अनेकजणी खास गाणं आणि अदा शिकायला यायच्या. गोदावरीबाई पुणेकर, अनसुयाबाई जेजुरीकर, कौसल्या कोपरगावकर, भामाबाई पंढरपूरकर, यमुनाबाई वाईकर, गुलाबबाई संगमनेरकर या महाराष्ट्र गाजवणाऱ्या लावणीगायिकांकडे रागदारी लावणीची परंपरा अशीच झिरपत आली.

मात्र दरम्यानच्या काळात तमाशा किंवा लावणी कलेत असलेल्या अश्लीलतेला विघातक वळण मिळत गेलं. असं असतानाही बैठकीच्या लावणीने मात्र आपलं 'कला'पण निगुतीने जपलं, कलेतल्या अश्लीलतेसकट. ते कसं हे पाहायचं असेल, तर त्यासाठी थेट बैठकीच्या लावणीच्या दिवाणखान्यातच प्रवेश करावा लागेल. पण ते शक्य नसल्यास प्रसिध्द संगीततज्ज्ञ डॉ. अशोक रानडे यांनी बसविलेल्या 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमावरूनही त्याचा अंदाज येऊ शकतो. कारण हा कार्यक्रम म्हणजे डॉ. रानडे यांनी संशोधन करून जमविलेल्या विविध विषयांवरील बैठकीच्या लावण्यांचा लोभस आविष्कार आहे.

सर्वसाधारणपणे मराठेशाहीच्या अस्तकाळात आणि नंतरही लिहिल्या गेलेल्या लावण्या अश्लीलच आहेत, असा एक समज आहे. परंतु अशोक रानडे यांनी बसविलेला बैठकीच्या लावण्यांचा कार्यक्रम पाहिला-ऐकला की या लावण्यांमध्येही किती विषयवैविध्य आहे ते लक्षात येतं. विशेषतः कॉलेजात जाणाऱ्या पतीविषयी तक्रार करणाऱ्या विरहिणीची लावणी ऐकून धक्काच बसतो. म्हणूनच आपल्या कार्यक्रमाबद्दल बोलताना डॉ. अशोक रानडे म्हणतात, 'बैठकीच्या लावणीकडे आजवर एकांगीच बघितलं गेलंय. परंतु उत्तर पेशवाई किंवा नंतरच्याही काळात लिहिली गेलेली लावणी पाहिली, तर त्या-त्या काळाचं प्रतिबिंब लावणीरचनेत उतरलेलं आढळतं. उदाहरणार्थ शिक्षणाला सुरुवात झाल्यावर कॉलेजात जाणाऱ्या पतीवर लावणी लिहिली गेली, तशीच मुंबईत भायखळ्याला राणीची बाग सुरू झाल्यावर तत्कालीन लावणीकरांनी त्यावरही लावणी रचली. म्हणजे त्या-त्या काळात जे सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन होतं होतं, त्याची दखल लावणीकार घेत होते. मी बसविलेल्या लावणीच्या कार्यक्रमातून मला हेच लोकांसमोर आणायचं आहे.'

रानडेसरांनी सर्वप्रथम हा कार्यक्रम वीसेक वर्षांपूर्वी ते एनसीपीएमध्ये संचालक असताना सादर केला होता. त्यावेळी त्यांनी या कार्यक्रमासाठी श्रुती सडोलीकर-काटकर, कीर्ती शिलेदार, फैयाज अशा मान्यवर गायिकांकडून बैठकीच्या विविध लावण्या गाऊन घेतल्या होत्या. ९ एप्रिलच्या शनिवारी सादर होणारा कार्यक्रम तोच आहे. मात्र गाणारे कलावंत वेगळे आहेत. अर्थात रानडेसरांच्या तालमीतच ते तयार झालेले असल्यामुळे त्यांनी गायिलेल्या लावण्यां ऐकताना त्या लावण्यांचं वजन ऐकणाऱ्याला पुरेपूर जाणवतं. विशेष म्हणजे वीस वर्षांपूर्वीच्या कार्यक्रमासाठी रानडेसरांनी केलेलं संशोधन तिथेच थांबलं नाही. उलट ते सुरूच राहिलं. या नवीन संशोधनाची झलकही या कार्यक्रमात बघायला मिळणार आहे.

एनसीपीएमध्येच सादर होणाऱ्या या कार्यक्रमाची मेजवानी रसिकांसाठी उपलब्ध करून दिलीय 'श्री चॅरिटेबल ट्रस्ट', 'आशालता ट्रस्ट' आणि 'गोपीनाथ सावकार स्मृती विश्वस्त निधी' या तीन सामाजिक-सांस्कृतिक संस्थांनी मिळून. हा कार्यक्रम विनामूल्य आहे. कारण त्यासाठी निर्लेप अप्लायन्सेस, परांजपे स्कीम्स्, रवींद्र पोतदार, आयावर्त(दापोली), चौगुले समूह(गोवा), एनकेजीएसबी बँक, दि श्यामराव विठ्ठल को ऑप बँक अशा विविध संस्थांचं प्रायोजकत्व लाभलेलं आहे. तर माध्यम प्रायोजकत्वाची जबाबदारी 'महाराष्ट्र टाइम्स'ने उचललेली आहे.

निवडक रसिकांच्या बैठकीत धिम्या, पण दमदार आवाजात आजवर पेश होत आलेली बैठकीची लावणी खरं तर इरसाल आणि तरीही ती आजवर आब राखून राहिलेली आहे. आपलं घरंदाजपण तिने टिकवून ठेवलं आहे. यामागे तिची सत्त्वशीलता आहे. या सत्त्वशीलतेचा अनुभव रानडेसरांनी बसविलेला कार्यक्रम बघून नक्कीच येईल.

लावणीचा लाघवी संसार

लावणीविषयीच्या पारंपरिक समजुतींची जळमटं साफ करणारा,बैठकीच्या लावणीची मैफल सजविणारा रंगतदार कार्यक्रम एन सी पी ए मध्ये अलिकडेच झाला. व्यासंगी संगीत अभ्यासक डॉ. अशोक रानडे यांनी खुमासदार टोलेबाजी आणि माहितीपूर्ण विवेचन यांचा समतोल साधत केलेला हा कार्यक्रम गायक-वादक कलावंतानी आपल्या कौशल्याने अधिकच बहारदार केला. 'कलेच्या प्रांतात,जे जे आवडले ते ते महाराष्ट्राने आपलेसे केले आणि त्यातले जे जे रूचले नाही ते टाकून दिले.'असे सांगत रानडे यांनी महाराष्ट्राच्या संगीत परंपरेचे वर्णन केले.संगीताचे सहा प्रकार गेली दोन हजार वर्षे अस्तित्वात आहेत, अशी माहिती देत त्यांनी विविध गायन प्रकार, वाद्ये यांविषयीच्या समजुती रूढी आणि परंपरा यांचा खुलासा केला. लावणीच्या संदर्भात बोलण्याच्या ओघात त्यांनी या कला प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराज आणि संत रामदास यांनी आश्रय दिला होता, अशीही माहिती दिली परंतु पुढे त्यावर अधिक प्रकाश मात्र टाकला नाही.

ढोल, ढोलक आणि ढोलकी यांतील नेमका फरक सांगत, छक्कड, ठुमरी, विराणी, उडती चाल, द्वंदगीत, टप्पा या सर्व प्रकारांचा लावणीत कसा अंतर्भाव होतो याची उदाहरणे देत त्यांनी गायकांकडून ते ते प्रकार सादर केले. लावणी मुख्यतः खुल्या मैदानात सादर केली जात असे त्यामुळे त्यात आक्रमक वाद्य हवे होते म्हणून ढोलकीचा वापर कोला जाऊ लागला, असे त्यांनी लावणीच्या स्वरुपाची चर्चा करताना सांगितले.

लावणीच्या रंगमंचीय आणि नेहमी ऐकायला मिळणाऱ्या स्वरूपापेक्षा अत्यंत वेगळ्या चालींच्या आणि शब्दरचनांच्या लावण्या यावेळी ऐकवल्या गेल्या त्यामुळे खरेतर अनेकदा लावणी या प्रकाराची स्वतःची स्वतंत्र ओळख आहे की नाही, असाही प्रश्न पडला. आता ग पोरी हळू चाल,जाई जुईची सेज फुलांची,माझ्या चतुरारे मैतरा तुझ्या लागी जीव माझा जडला,छबीदार सूरत (होनाजी बाळा), पडिले दूर देशी(संत ज्ञानेश्वर),सुमन मंचकी(अण्णासाहेब किर्लोस्कर) आज का गे कागा बोलतो घरावरी,चला चला महाली चला, पती माझे गं कालेजात गेले अशा लावण्या सादर केल्या. शाहीर राम जोशी यांची संस्कृत-मराठी लावणीही यावेळी म्हटली गेली.

फैयाज यांनी गायलेली अदाकारीची 'तुम्ही माझे सावकार जीवलगा' ही लावणी या कार्यक्रमाचा कळस होता. पु.ल. देशपांडे यांनी रानडे यांना कधीकाळी परिचय करून दिलेल्या 'नका टाकून जाऊ डावा डोळा पाण्यानं माझा भरला' या भैरवीनं, घुंगराविणा झालेली, लावणीची ही बैठक संपली. शेखर खांबेटे(तबला) कृष्णा मुसळे(ढोलकी), नीला सोहनी, मकरंद कुंडले(दोन्ही हार्मोनियम), राजेंद्र भावे (व्हायोलिन) या वादकांनी आणि कल्याणी साळुंके, सुरेश बापट, अपूर्वा गोखले, पल्लवी जोशी, प्राची दुबळे या गायकांनी या बैठकीला स्वराचा साज चढविला. ■

अभिरुची समन्वयक :
उमेश करंदीकर, स्वानंद विष्णू ओक

१७/१/२०११, रविवार लोकसत्ता

लावणीचा लाघवी संसार

लावणीविषयीच्या पारंपरिक समजुतींची जळमटं साफ करणारा,बैठकीच्या लावणीची मैफल सजविणारा रंगतदार कार्यक्रम एन सी पी ए मध्ये अलिकडेच झाला. व्यासंगी संगीत अभ्यासक डॉ. अशोक रानडे यांनी खुमासदार टोलेबाजी आणि माहितीपूर्ण विवेचन यांचा समतोल साधत केलेला हा कार्यक्रम गायक-वादक कलावंतानी आपल्या कौशल्याने अधिकच बहारदार केला. 'कलेच्या प्रांतात,जे जे आवडले ते ते महाराष्ट्राने आपलेसे केले आणि त्यातले जे जे रूचले नाही ते टाकून दिले.' असे सांगत रानडे यांनी महाराष्ट्राच्या संगीत परंपरेचे वर्णन केले.संगीताचे सहा प्रकार गेली दोन हजार वर्षे अस्तित्वात आहेत, अशी माहिती देत त्यांनी विविध गायन प्रकार, वाद्ये यांविषयीच्या समजुती रूढी आणि परंपरा यांचा खुलासा केला. लावणीच्या संदर्भात बोलण्याच्या ओघात त्यांनी या कला प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराज आणि संत रामदास यांनी आश्रय दिला होता, अशीही माहिती दिली परंतु पुढे त्यावर अधिक प्रकाश मात्र टाकला नाही.

ढोल, ढोलक आणि ढोलकी यांतील नेमका फरक सांगत, छक्कड, ठुमरी, विराणी, उडती चाल, द्वंदगीत, टप्पा या सर्व प्रकारांचा लावणीत कसा अंतर्भाव होतो याची उदाहरणे देत त्यांनी गायकांकडून ते ते प्रकार सादर केले. लावणी मुख्यतः खुल्या मैदानात सादर केली जात असे त्यामुळे त्यात आक्रमक वाद्य हवे होते म्हणून ढोलकीचा वापर कोला जाऊ लागला, असे त्यांनी लावणीच्या स्वरुपाची चर्चा करताना सांगितले.

लावणीच्या रंगमंचीय आणि नेहमी ऐकायला मिळणाऱ्या स्वरूपापेक्षा अत्यंत वेगळ्या चालींच्या आणि शब्दरचनांच्या लावण्या यावेळी ऐकवल्या गेल्या त्यामुळे खरेतर अनेकदा लावणी या प्रकाराची स्वतःची स्वतंत्र ओळख आहे की नाही, असाही प्रश्न पडला. आता ग पोरी हळू चाल,जाई जुईची सेज फुलांची,माझ्या चतुरारे मैतरा तुझ्या लागी जीव माझा जडला,छबीदार सूरत (होनाजी बाळा), पडिले दूर देशी(संत ज्ञानेश्वर),सुमन मंचकी(अण्णासाहेब किर्लोस्कर) आज का गे कागा बोलतो घरावरी,चला चला महाली चला, पती माझे गं कालेजात गेले अशा लावण्या सादर केल्या. शाहीर राम जोशी यांची संस्कृत-मराठी लावणीही यावेळी म्हटली गेली.

फैयाज यांनी गायलेली अदाकारीची 'तुम्ही माझे सावकार जीवलगा' ही लावणी या कार्यक्रमाचा कळस होता. पु.ल. देशपांडे यांनी रानडे यांना कधीकाळी परिचय करून दिलेल्या 'नका टाकून जाऊ डावा डोळा पाण्यानं माझा भरला' या भैरवीनं, घुंगराविणा झालेली, लावणीची ही बैठक संपली. शेखर खांबेटे(तबला) कृष्णा मुसळे(ढोलकी), नीला सोहनी, मकरंद कुंडले(दोन्ही हार्मोनियम), राजेंद्र भावे (व्हायोलिन) या वादकांनी आणि कल्याणी साळुंके, सुरेश बापट, अपूर्वा गोखले, पल्लवी जोशी, प्राची दुबळे या गायकांनी या बैठकीला स्वराचा साज चढविला. ■